दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १५८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## पुढील सात महिन्यासाठी वेरूळ मार्ग अवजड वाहनांसाठी बंद

**छत्रपती संभाजीनगर :** आज पासून (२९ सप्टेंबर 26 ते २९ मार्च २७) या काळासाठी वेरुळ खुलताबाद रस्ता अवजड वाहनासाठी बंद करण्यात येत असल्याचे आदेश पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी जारी केले आहेत. भुयारी मार्गाच्या बांधकामामुळे २९ सप्टेंबरपासून वाहतूक व्यवस्थेत बदल; पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे पोलिस अधीक्षक यांनी आवाहन केले आहे वेरूळ, ता. खुलताबाद येथील विकास आराखड्यांतर्गत श्री घृष्णेश्वर मंदिरासमोरील राज्य मार्ग येथे भुयारी मार्गाच्या बांधकामाचे काम सुरू करण्यात येणार आहे.

## अहिल्यानगरच्या उपनिरीक्षकसह पाच जणांच्या त्वरित बदल्या

**अहिल्यानगर :** महानगरपालिका कार्यालयाजवळील एका इमारतीत बाहेरून आणलेली संशयास्पद पिशवी ठेवून विशाल भिकाजी पारखे यांच्याविरुद्ध खोटी गांजाची केस तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी केला होता . त्यांनी २२ सप्टेंबर रोजी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांची समक्ष भेट घेऊन संपूर्ण प्रकार त्यांच्या निदर्शनास आणून दिला. कथित कारवाईचे वेळनिहाय CCTV फुटेज त्यांना दाखवून त्याची प्रतही त्यांच्या ताब्यात देण्यात देऊन दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करावी अन्यथा २८ सप्टेंबरपासून नाशिक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयासमोर उपोषणाला बसणार, असा इशारा दिला होता .

## थोडक्यात वार्ता

### माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे वाचन करा; विजय देशमुख

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विभागीय आयुक्त कार्यालयात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. माहितीचा अधिकार अधिनियमातील विविध तरतुदींचे सातत्याने वाचन करून त्यातील नियम सखोलपणे समजून घेणे प्रत्येक अधिकाऱ्यासाठी आवश्यक आहे. अधिनियमातील तरतुदी व नियमांची योग्य आणि अचूक माहिती असल्यास माहिती अधिकाऱ्यांना कोणतेही दडपण न घेता विहित प्रक्रियेनुसार आणि निर्धारित कालावधीत माहिती उपलब्ध करून देणे अत्यंत सुलभ होते, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन माहिती अधिकार कायद्याचे तज्ज्ञ तथा महिला व बालविकास विभागाचे स्वेच्छानिवृत्त जिल्हा परिविक्षा अधिकारी विजय देशमुख यांनी यावेळी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमास सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मार्गदानात पुढे बोलताना श्री. देशमुख म्हणाले की, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्जदारांना ठरवून दिलेल्या विहित कालावधीतच माहिती उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. माहिती अधिकारी म्हणून कार्य करत असताना उपलब्ध अभिलेख, अधिनियमातील कायदेशीर तरतुदी आणि नियमांची अचूक माहिती असणे गरजेचे असून, माहिती देताना अधिकाऱ्यांची भूमिका आणि जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असते, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, विविध व्यावहारिक उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीतील कायदेशीर बारकावे उपस्थितांना समजावून सांगितल्यामुळे अनेकांना मार्गदर्शन मिळाले.

### तलावांमधील गाळ काढण्यास प्राधान्य द्यावे : नितेश राणे

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत राज्य शासनाच्या वतीने दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. दुष्काळी स्थितीत विभागातील तलावांमधील गाळ काढण्याचे काम केल्यास जलसाठ्याची पातळी वाढून मत्स्योत्पादनात मोठी वाढ होईल, त्यामुळे ही कामे सर्वोच्च प्राधान्याने पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज दिले आहेत. या दौऱ्यादरम्यान मंत्री नितेश राणे यांनी कन्नड तालुक्यातील शिवणाटाकळी येथील तलावाची प्रत्यक्ष पाहणी करून स्थानिक मच्छीमार बांधवांशी सविस्तर संवाद साधला, तसेच जालना जिल्ह्यातील तलावांची पाहणी करत मच्छिमारांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीस मत्स्यआयुक्त भानुदास पालवे, सह आयुक्त ऋता दीक्षित, प्रादेशिक आयुक्त सुरेश भारती, सहाय्यक आयुक्त माधुरिमा जाधव, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे यांच्यासह जलसंपदा, जलसंधारण विभाग तसेच बीड, जालना, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, विभागातील ३७ तालुक्यांमध्ये एकूण ३८६ पाटबंधारे तलाव असून, ३८९ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या माध्यमातून १५ हजार २७६ सभासद कार्यरत आहेत. या विभागाचे एकूण जलक्षेत्र ४७ हजार ४७ हेक्टर असून, ७४३.६४ लाख मत्स्यबीज संचयन क्षमता आणि १९ हजार ४३२ मेरिक टन मत्स्योत्पादन क्षमता आहे. मात्र, सध्याच्या अवर्षण स्थितीमुळे १०६ तलाव पूर्णपणे कोरडेठाक पडले आहेत, तर १११ तलावांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी आणि १६९ तलावांमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त जलसाठा उपलब्ध आहे.

### "शाल जोडे"




## 39व्या राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी 20 राज्यांचे 38 संघ शहरात 722 खेळाडूंचा सहभाग; महाराष्ट्राच्या मुला-मुलींचे संघ सज्ज

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय सॉफ्टबॉल असोसिएशनच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ३९वी सबज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्टबॉल मुले-मुली स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सुरू आहे. २६ ते ३० सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी देशातील २० राज्यांचे ३८ संघ शहरात दाखल झाले असून, ७२२ खेळाडू सहभागी झाले आहेत.



स्पर्धेसाठी विद्यापीठ परिसरात चार मैदाने तयार करण्यात आली आहेत. मुलांचे आणि मुलींचे स्वतंत्र पूल करण्यात आले असून, साखळी सामने आणि त्यानंतर बाद फेरीच्या पद्धतीने सामने खेळविले जाणार आहेत. सहभागी खेळाडूंच्या निवास आणि भोजनाची व्यवस्था छत्रपती संभाजीनगर जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनतर्फे करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी देशभरातून पंच आणि तांत्रिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या फुटबॉल मैदानावर झालेल्या कार्यक्रमास भारतीय सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार रमेशजी मंडोला, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य दत्ता भांगे, जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर, महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेचे सहसचिव डॉ. उदय डोंगरे, महाराष्ट्र सॉफ्टबॉल असोसिएशनचे सचिव डॉ. प्रदीप तळवलकर, जिल्हा ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष पंकज भारसागळे आदी उपस्थित होते.

**संभाजीनगरचे दोघे महाराष्ट्र संघात :** या स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगरचे वीरांशराजे भुमरे आणि सिद्धेश्वर कुबडे यांची महाराष्ट्राच्या मुलांच्या संघात निवड झाली आहे.

महाराष्ट्राच्या मुलांच्या संघात राही सावलीया, नैतिक मोहनती, स्वराज माने, मोहित तुपते, हर्षल नारनवरे, सिद्धेश्वर कुबडे, हर्षवर्धन गाढवे, वीरांशराजे भुमरे, यश फाळके, देवराज साळुंखे, मयूर चौधरी, युवराज वानखेडे, कार्तिक पाटील, नैतिक सरोज, अर्धव्यू कोतंगळे, शिवम धोंडवाड, हिमांशू बामणे आणि सक्षम शिंदे यांचा समावेश आहे. प्रशिक्षक संतोष आवचार व अक्षय येवले, तर व्यवस्थापक गणेश बेटूदे आहेत. महाराष्ट्राच्या मुलींच्या संघात शर्वली देवकर, मेहेक लोढा, पौर्णिमा दिंडे, मृण्मयी पवार, मधुश्री सावंत, राजवर्धिनी कदम, संतोषी ठाकरे, दिव्या मटाले, प्रणिती वाघमारे, मृणाली दरेकर, प्रज्ञा वायदंडे, शर्वरी सांडगे, प्रणिता मुजुमदार, मंजिरी साबळे, गौरी राणे, श्रद्धा चिकटे, धनश्री घाडगे आणि ऋतुजा लोंढे यांचा समावेश आहे. प्रशिक्षक ईश्वरी शिंदे व मयुरी चव्हाण, तर व्यवस्थापक अमृता शेळके आहेत.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनचे खेळाडू, पंच, अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे पदाधिकारी प्रयत्न करत आहेत, अशी माहिती डॉ. फुलचंद सलामपुरे व डॉ. प्रदीप तळवलकर यांनी दिली.

## SIR विरोधात काँग्रेसचा एल्गार; ज्ञानेश कुमार यांच्या अटकेची मागणी
# पुतळा जाळून गाढवावर पोस्टर लावत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

हिंदू प्रकाशवार्ता

**छत्रपती संभाजीनगर :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या (SIR) प्रक्रियेवरून काँग्रेसने निवडणूक आयोगाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोंगांवकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारवाईसह अटकेची मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी ज्ञानेश कुमार यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळत तसेच गाढवावर त्यांचे पोस्टर लावून निषेध नोंदविला.




भारतीय निवडणूक आयोगाच्या अधिकृत माहितीनुसार ज्ञानेश कुमार हे सध्या मुख्य निवडणूक आयुक्त असून त्यांनी १९ फेब्रुवारी २०२५ रोजी पदभार स्वीकारला आहे.

काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात SIR प्रक्रियेबाबत गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. या प्रक्रियेमुळे मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. मतदारांना मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित ठेवण्याची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता राखण्याची मागणी पक्षाने केली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत काँग्रेसने निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनीही काही निर्णयांवर आक्षेप घेतल्याचा दावा निवेदनात केला आहे. या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी या वृत्तासाठी उपलब्ध झालेली नाही. निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर मात्र ज्ञानेश कुमार यांच्यासोबत सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी हे दोघेही निवडणूक आयुक्त म्हणून कार्यरत असल्याचे नमूद आहे.

बिहार आणि पश्चिम बंगालमधील मतदार यादी पुनरावलोकनाच्या प्रक्रियेचा संदर्भ देत काँग्रेसने मतदारांच्या नावांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. मतदार यादी तयार करण्याची व तिची दुरुस्ती करण्याची प्रक्रिया पारदर्शक असावी, तसेच पात्र मतदाराचे नाव कोणत्याही कारणाने वगळले जाणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसने केली.

काँग्रेसने SIR प्रक्रियेबाबत उपस्थित केलेल्या आरोपांची चौकशी करून त्यात अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून केली आहे.

## तलावांची पाहणी; मच्छीमार बांधवांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन : नितेश राणे




हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - कन्नड तालुक्यातील शिवणाटाकळी येथे दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज भेट दिली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शिवणाटाकळी येथील तलावाची पाहणी करून स्थानिक मच्छीमार बांधवांशी संवाद साधला, तसेच त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेत शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याचा ठोस विश्वास दिला.

या पाहणी दौऱ्यावेळी त्यांच्यासोबत कन्नड विधानसभा मतदारसंघाच्या आमदार संजना जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी जान्हवी शेखर, मत्स्यआयुक्त भानुदास पालवे, सह आयुक्त ऋता दीक्षित, प्रादेशिक आयुक्त सुरेश भारती, सहाय्यक आयुक्त माधुरिमा जाधव यांच्यासह आदिवासी मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्था, आबासाहेब पाटील मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांचे पदाधिकारी, स्थानिक मच्छीमार बांधव आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित तलाव, जलाशय व इतर जलसाठ्यांचे तातडीने पंचनामे करण्याच्या अनुषंगाने ही पाहणी अत्यंत महत्त्वाची ठरली. यंदाच्या हंगामात कमी पर्जन्यमान झाल्यामुळे शिवणाटाकळी तलावातील पाण्याची पातळी तब्बल ३४ टक्क्यांपर्यंत घटली असून, या जलसंकटाचा थेट परिणाम मत्स्य उत्पादनावर होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

## पदवीधर मतदारसंघ निवडणूक; आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात मनाई आदेश जारी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून, निवडणूक प्रक्रिया अत्यंत शांततापूर्ण, निर्भय व सुरळीत पार पाडावी यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह आवश्यक सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी कडक निर्देश देत विविध प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केले आहेत.

निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत सार्वजनिक शांतता आणि सुरक्षितता टिकवून ठेवण्यासाठी ध्वनीक्षेपकांच्या वापरावर कठोर निर्बंध लादण्यात आले आहेत. त्यानुसार, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणालाही ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, तसेच सकाळी ६ ते रात्री १० वाजेच्या वेळेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर किंवा खुल्या क्षेत्रात लाऊडस्पीकर वाजवण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

## 'महिला शेतकरी प्रमाणपत्रा'साठी महिलांनी पुढे यावे : सुनील वानखेडे

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र शासनाने महिला शेतकऱ्यांना विविध कल्याणकारी धोरणे, योजना, पतकर्ज, कृषी निविष्ठा आणि विमा संरक्षणाचा लाभ सुलभतेने मिळावा यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६' लागू केला आहे. या नव्या अधिनियमांतर्गत पात्र महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' प्रदान केले जाणार असून, विभागातील जास्तीत जास्त पात्र महिलांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन वानखेडे यांनी केले आहे.

या महत्त्वपूर्ण प्रमाणपत्रासाठी १८ वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या आणि कृषी, पशुपालन, फलोत्पादन किंवा शेतीशी संबंधित इतर कामांमध्ये प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या महिला पात्र ठरणार आहेत. यासाठीची ऑनलाइन अर्ज प्रक्रिया अत्यंत सुलभ ठेवण्यात आली असून, महिला शेतकऱ्यांना महाकृषीच्या महिला शेतकरी सेवा पोर्टलवर जाऊन 'Apply Now' हा पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर नाव व जिल्हा निवडून नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेल्या ओटीपीद्वारे (OTP) पडताळणी पूर्ण करावी लागते. अर्जामध्ये वैयक्तिक माहिती, पत्ता आणि शेतीकामाचा योग्य प्रकार नमूद करावा लागतो. तसेच, कुटुंबातील कोणत्याही सदस्याचा Farmer ID उपलब्ध असल्यास तो या अर्जाशी लिंक करण्याची सोय देखील यात देण्यात आली आहे. अर्जातील सर्व माहितीची खात्री पटल्यानंतर 'Submit Application' या पर्यायावर क्लिक करून अर्ज यशस्वीरीत्या सादर करता येतो. स्थानिक स्तरावर ग्रामसभा अथवा नगरपंचायतीच्या मान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, विहित कालावधीत पदनिर्देशित अधिकाऱ्यांमार्फत पात्र महिलांना हे प्रमाणपत्र निर्गमित केले जाणार आहे. शासनाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे महिला शेतकऱ्यांना शेती क्षेत्रात हक्काची ओळख आणि अधिकार मिळण्यास मदत होणार असून, छत्रपती संभाजीनगर विभागातील अधिकाधिक महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# भाजपाचा वाढता जनाधार हीच काँग्रेसची खरी पोटदुखी : दानवे

## SIRवरून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न; निवडणूक आयोगातील मतभेदांचे 'फेक नॅरेटिव्ह' उद्ध्वस्त झाल्याचा दावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**जालना :** भाजपाचा वाढता जनाधार हीच काँग्रेसची खरी पोटदुखी असून, SIR सह निवडणूक प्रक्रियेवरून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केला. निवडणूक आयोगातील तीनही आयुक्तांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमुळे राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उभा केलेला 'फेक नॅरेटिव्ह' उद्ध्वस्त झाला आहे, असा दावाही त्यांनी केला.



जालना येथे पत्रकार परिषदेत दानवे यांनी राहुल गांधी आणि काँग्रेसवर जोरदार टीका केली. राहुल गांधी हातात संविधानाचे पुस्तक घेऊन संवैधानिक संस्थांवर सातत्याने आरोप करीत आहेत. या संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे ते म्हणाले. संविधानाचा दाखला देताना त्याच संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही संस्था मान्य नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

SIRच्या मुद्द्यावर बोलताना दानवे म्हणाले की, SIRसह सर्व प्रक्रिया एकमताने झाल्या असून, निवडणूक आयोगातील तीनही आयुक्तांमध्ये कोणताही 'डिफरन्स ऑफ ओपिनियन' नाही. कॅबिनेट सचिवांकडे पाठविलेले पत्र कोणत्याही धोरणात्मक विषयाशी संबंधित नव्हते, तर डेप्युटेशनवरील नियुक्तीशी संबंधित होते. मात्र, त्याला वेगळे स्वरूप देऊन आयोगात मतभेद असल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने ज्या स्वरूपात फॉर्म क्रमांक ६ वैध ठरविला आहे, त्याच स्वरूपात तो वापरला जात आहे. त्यामुळे या प्रक्रियेवरून संभ्रम निर्माण करणे म्हणजे न्यायालयाच्या निर्णयाबाबतही जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे दानवे म्हणाले.

**'पराभवाचे खापर आयोगावर का?'**

तेलंगणा, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकात काँग्रेस किंवा विरोधकांना विजय मिळाल्यानंतर निवडणूक आयोग चांगला होता. मात्र, भाजप विजयी झाल्यानंतर त्याच आयोगावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत, असा सवाल दानवे यांनी केला. पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडणे हा जनतेच्या निर्णयाचा अवमान असल्याचे ते म्हणाले. राजकीय पक्षांनी जनतेचे प्रश्न घेऊन जनतेत जावे, जनता त्यांना प्रतिसाद देईल, असेही त्यांनी सांगितले.

ईव्हीएमबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. निवडणूक आयोगाने ईव्हीएम हॅक करून दाखविण्याचे आव्हान दिले होते; मात्र ते सिद्ध करण्यात कोणीही यशस्वी झाले नाही, असा दावा दानवे यांनी केला. त्यामुळे आता ईव्हीएमऐवजी निवडणूक आयोगालाच लक्ष्य केले जात असल्याचे ते म्हणाले. 'व्होटचोरी'चा आरोप करणाऱ्यांवर टीका करताना त्यांनी उपहासात्मक भाषेत त्यांच्यावर निशाणा साधला.

**'SIRनंतरही टीएमसीचा विजय कसा?'**

पश्चिम बंगालमध्ये SIRदरम्यान मतदारसंख्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचा दावा करण्यात आलेल्या १५ मतदारसंघांत तृणमूल काँग्रेस विजयी झाल्याचे दानवे यांनी सांगितले. वगळलेले मतदार भाजपचेच होते, तर या मतदारसंघांमध्ये टीएमसी कशी विजयी झाली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. २००४ मध्येही SIR झाला होता. अशी प्रक्रिया नियमितपणे व्हायला हवी, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरांमध्ये स्थलांतरामुळे वगळलेल्या किंवा न सापडलेल्या मतदारांची संख्या अधिक असल्याचे दानवे यांनी सांगितले. अनेक मतदारांची नावे गाव आणि शहर अशा दोन्ही ठिकाणी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या बूथ लेव्हल अधिकाऱ्यांमार्फत मतदार याद्यांची पडताळणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

मतदार याद्यांवर प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करून याद्या अचूक व पारदर्शक करण्यासाठी सहकार्य करावे. भारताचे संविधान आणि त्याने निर्माण केलेल्या संस्था अबाधित राहतील, असा विश्वास व्यक्त करत संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याच्या मोहिमेला जनताच उत्तर देईल, असे दानवे यांनी सांगितले.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, नगरसेवक अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, ॲड. रिमा खरात, वसंत जगताव, मारोती राऊत, परीक्षित शिंदे, रोहित खोडवे, तुकाराम चव्हाण, बबनराव सिरसाठ, विष्णू मात्रे आदी उपस्थित होते.

# संपादकीय

## राज्याची आर्थिक शिस्त आणि शाश्वत विकास

महाराष्ट्रासारख्या देशातील अग्रगण्य आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्याला आपल्या विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी शाश्वत सार्वजनिक वित्ताची भक्कम साथ असणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर, राज्याच्या आर्थिक व्यवस्थेत आवश्यक सुधारणा घडवून आणण्यासाठी सहा महिन्यांत कृतीचा आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी 'महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीला' दिले आहेत. हे पाऊल अत्यंत वेळेत आणि राज्याच्या भविष्यातील आर्थिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले पाहिजे. राज्यातील निधी उभारणी, आधुनिक लेखांकन आणि उपलब्ध संसाधनांचे कार्यक्षम नियोजन या तीन प्रमुख आघाड्यांवर वेगाने पावले उचलण्याची गरज स्वतः प्रशासनाच्या प्रमुखांनी अधोरेखित केली आहे, ही बाब सुदृढ आर्थिक नियोजनाची नांदी आहे. या बैठकीच्या निमित्ताने राज्याच्या आर्थिक कारभारातील एक अत्यंत गंभीर आणि आश्चर्यकारक विसंगती उघडकीस आली आहे. राज्यातील विविध सरकारी यंत्रणा आणि प्राधिकरणांकडे तब्बल सहा ते सात हजार कोटी रुपयांचा निधी अवघ्या चार टक्के व्याजदराने पडून असतो किंवा गुंतवला जातो; आणि दुसरीकडे राज्य सरकारला आपल्या विकास प्रकल्पांसाठी बाजारातून आठ ते नऊ टक्के दराने महागडे कर्ज घ्यावे लागते. उपलब्ध स्वतःचा निधी कमी व्याजदराने पडून राहणे आणि त्याच वेळी दुप्पट व्याजदराने नवीन कर्ज उभारणे, ही प्रशासकीय व आर्थिक नियोजनातील मोठी त्रुटी आहे. ही विसंगती तात्काळ दूर करून, संबंधित संस्थांचे आर्थिक स्वातंत्र्य व सुरक्षेचा संकोच न करता, हा पडून राहिलेला निधी अंतर्गत व्यवस्थेत कसा वापरता येईल, यासाठी अभिनव आर्थिक साधने विकसित करण्याची नितांत गरज आहे.

## एआय प्लस स्मार्टफोन ने या सणासुदीत फ्लॅगशिप दर्जाचे तंत्रज्ञान

**मुंबई :** सणासुदीच्या हंगामापूर्वी एआय प्लस स्मार्टफोन ने आज पल्स २ एफई, नोव्हाटॅब आणि लॅपटॅब लाँच करून आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार जाहीर केला. संवाद, शिक्षण, मनोरंजन आणि उत्पादकता या क्षेत्रांत ग्राहकांना तीन नवे तंत्रज्ञान अनुभव मिळतील. देशभरातील ग्राहक वर्षातील तंत्रज्ञान खरेदी, अपग्रेड आणि भेटवस्तूंच्या सर्वात मोठ्या काळासाठी तयारी करत असतानाच हे लाँच होत आहे. या नव्या श्रेणीमुळे एआय प्लस स्मार्टफोन वेगवेगळ्या गरजा आणि किंमत गटांसाठी अधिक पर्याय देत आहे. पहिला स्मार्टफोन घेणाऱ्यांपासून, कनेक्टेड शिक्षणासाठी उपकरण शोधणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत आणि मनोरंजन व कामकाज सहजतेने एकाच मोठ्या स्क्रीनवर करू इच्छिणाऱ्यांपर्यंत सर्वांसाठी यात काही ना काही आहे.

## आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (एईएसएल) ने अँथे 2026 सुरु

**नांदेड :** स्पर्धात्मक शैक्षणिक प्रवासाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, काय अभ्यास करायचा हे जाणून घेणे हे केवळ एक समीकरण आहे. आपण कुठे आहोत, आपण काय चांगले करत आहोत आणि आपल्याला कुठे सुधारणा करण्याची गरज आहे, हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे असू शकते. तयारी आणि आत्म-जागरूकता यांमधील हीच दरी आकाश राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षेने (अँथे) गेल्या १६ वर्षांपासून भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे. सुरुवातीपासून १ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी अँथे साठी नोंदणी केल्यामुळे, ही परीक्षा भारतातील सर्वात मोठ्या आणि दीर्घकाळ चालणाऱ्या विद्यार्थी मूल्यांकन मंचांपैकी एक बनली आहे. प्रतिभा ओळखण्याचा एक उपक्रम म्हणून जे सुरू झाले होते, ते आता एका संरचित शैक्षणिक मापदंडात विकसित झाले आहे, जे विद्यार्थ्यांना त्यांच्या तयारीचे मूल्यांकन करण्यास, त्यांची स्पर्धात्मक क्षमता समजून घेण्यास आणि पुढील प्रवासासाठी एक मजबूत पाया तयार करण्यास मदत करते.

## संरक्षित शेतीच्या अनुदानाचा प्रश्ना संदर्भात शेतकरी आक्रमक एनएचबी पुणे कार्यालय वर मोर्चा..

**पुणे प्रतिनिधी :** केंद्र सरकारने राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या संरक्षित शेतीसाठीच्या विविध योजनांच्या अनुदानात १५% घट केल्यामुळे आणि अनुदानाचा लाभ घेण्यासाठी जाचक अटी -शर्ती लागू केल्यामुळे हरितगृह आणि शेडनेट उभारणीकडे देशभरातील शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे हरितगृह आणि शेडनेट उभारणी व्यवसाय अडचणीत आला आहे. राजधानी दिल्ली येथे १५ सप्टेंबर ला राष्ट्रीय फलोत्पादन महामंडळ हरियाणात आणि १६ सप्टेंबर ला कृषी भवनासमोर दिल्लीत आंदोलन करून आलेले शेडनेट, हरितगृह धारक शेतकरी , पवना संकृती फपीसी आणि इंडियन ग्रीनहाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनच्या (इग्मा) पदाधिकाऱ्यांनी , महाराष्ट्र फुल उत्पादक संघ व पुणे फुल उत्पादक कंपनी यांनी राष्ट्रीय बागवानी मंडळ पुणे येथील कार्यालय वर धडक मोर्चा काढला यावेळी त्यांनी उपसंचालकाची भेट घेतली व विविध मागण्यांचे निवेदन दिले.या वेळी मावळ तालुक्यातील प्रगतीशील शेतकरी मुकुंद ठाकर व फुल उत्पादक संघ कंपनीचे सुमारे ४०० शेतकरी व इग्माचे राष्ट्रीय सचिव परमेश्वर तोर, सह सचिव आणि महाराष्ट्राचे अध्यक्ष तेजोमय घाडगे, वैभव खांडरे , नितीन जगताप , रोशन पिंगळे, जयदिप ननवरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते .

## मोटोरोलाच्या स्मार्टफोनवर बिग बिलियन डेजमध्ये आकर्षक सणासुदीच्या ऑफर्स

**मुंबई:** मोटोरोलाने आपल्या 'इट्स द टाइम टू मोटो' मोहिमेअंतर्गत #बिगबिलियनमोटो डील्सची घोषणा केली आहे. फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज २०२६ विक्रीदरम्यान कंपनीने आपल्या नवीनतम स्मार्टफोनवर आकर्षक सणासुदीच्या ऑफर्स जाहीर केल्या आहेत. २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून सुरू झालेल्या या विक्रीमध्ये मोटोरोलाचा एज ७० फ्युजन, मोटोरोलाचा एज ७० प्रो, मोटोरोलाचा एज ७० प्रो प्लस, मोटो जी३७ पॉवर, मोटोरोलाचा सिग्नेचर यांसह विविध स्मार्टफोन विशेष किमतीत उपलब्ध आहेत. मोटोरोलाच्या या सणासुदीच्या मोहिमेत ३० हजार रुपयांच्या आत फ्लॅगशिप वैशिष्ट्ये देणारा मोटोरोलाचा एज ७० फ्युजन यांचा समावेश आहे.

## या डॉटर्स डेला क्लिनिक प्लस सिद्ध करतं — मुलगी असते आईची मजबुती

मुंबई - क्लिनिक प्लसच्या नव्या चित्रफितीच्या केंद्रस्थानी हाच विचार आहे. डॉटर्स डेच्या निमित्ताने क्लिनिक प्लस आई आणि मुलीच्या त्या नात्याला सलाम करत आहे, ज्यात दोघी नकळत एकमेकींचं बळ बनतात. भारतीय घरांमध्ये आया आपल्या मुलींना स्वतःसाठी उभं राहायला आणि स्वतःचा आवाज शोधायला शिकवत आल्या आहेत — मात्र त्यांच्याकडूनच गप्प राहण्याची, जुळवून घेण्याची आणि स्वतःच्या वाट्याच्या तडजोडी मुकाट सोसण्याची अपेक्षा केली जाते. तरीही जे जगाच्या नजरेतून सुटतं, ते मुलगी नेमकं टिपते. आईचे न बोललेले त्याग ती सहज वाचते आणि कठीण प्रसंगातला तिचा संयम आत्मसात करते. ही चित्रफीत आजच्या मुलीला केवळ वाढवायची लेक म्हणून नव्हे, तर आईचा सर्वांत मोठा आधार म्हणून समोर आणते — अशी विश्वासाची सोबतीण, जिची संवेदनशीलता, शांत उपस्थिती आणि विश्वास आईला पुढे पाऊल टाकण्याचं आणि स्वतःला निवडण्याचं धैर्य देतो.

# नागरिकांच्या अडचणींवर प्रशासनाचा कायमस्वरूपी उपाय!

## 'सुधारणा उत्सव-२०२६'मधून लोकसहभागातून नागरिकाभिमुख प्रशासनाची नवी दिशा

शासकीय सेवा म्हणजे केवळ योजना, अर्ज, दाखले आणि परवानग्या नव्हेत. एखादी सेवा नागरिकाला किती सहज, किती कमी वेळेत आणि कमीत कमी प्रक्रियेत मिळते, यावर प्रशासनाची खरी परिणामकारकता ठरते. मात्र आजही एखादा साधा दाखला मिळविताना एकाच कागदपत्राच्या प्रती वेगवेगळ्या कार्यालयांत द्याव्या लागतात, शासनाकडे आधीच उपलब्ध असलेली माहिती पुन्हा सादर करावी लागते, एखाद्या मंजुरीसाठी अनावश्यक टप्पे पार करावे लागतात किंवा किरकोळ कामासाठीही नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागतात.

वर्षानुवर्षे प्रशासकीय कार्यपद्धतीचा भाग बनलेल्या अशा अडथळ्यांकडे आता नागरिकांच्या नजरेतून पाहून त्यावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याचा प्रयत्न राज्यात सुरू झाला आहे. याच उद्देशाने 'सुधारणा उत्सव (Reform Utsav)-२०२६' हे अभियान राबविण्यात येत आहे.

नागरिकांनी केवळ शासकीय सेवांचे लाभार्थी न राहता त्या सेवा अधिक सुलभ, गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक बनविण्याच्या प्रक्रियेत सक्रिय भागीदार व्हावे, ही या अभियानाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

नागरिकांच्या प्रत्यक्ष अनुभवातून समोर येणाऱ्या प्रशासकीय, प्रक्रियात्मक, तांत्रिक आणि संरचनात्मक सुधारणांच्या सूचनांचे संकलन करणे, त्यांची वस्तुनिष्ठ छाननी करणे आणि व्यवहार्य सूचनांचे प्रत्यक्ष प्रशासकीय सुधारणांमध्ये रूपांतर करणे, हा 'सुधारणा उत्सवा'चा गाभा आहे.

### 'तक्रार' नाही, व्यवस्थेत बदल घडविणारी 'सूचना'

'सुधारणा उत्सवा'चे वेगळेपण समजून घेण्यासाठी वैयक्तिक तक्रार आणि प्रशासकीय सुधारणा यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे.

एखाद्या व्यक्तीचे प्रलंबित काम मार्गी लावणे एवढ्यापुरते हे अभियान मर्यादित नाही. एखाद्या नागरिकाला आलेली अडचण समान परिस्थितीतील शेकडो किंवा हजारो नागरिकांना वारंवार येत असेल, तर त्या अडचणीमागील व्यवस्थात्मक कारण शोधून ते कायमस्वरूपी दूर करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे.

उदाहरणार्थ, एखाद्या नागरिकाचे प्रमाणपत्र प्रलंबित असणे ही वैयक्तिक तक्रार ठरू शकते. मात्र त्या प्रमाणपत्रासाठी आवश्यक माहिती शासनाच्या दुसऱ्या डेटाबेसमध्ये आधीपासून उपलब्ध असतानाही तीच माहिती किंवा कागदपत्र पुन्हा नागरिकाकडून मागितले जात असेल, तर ही पुनरावृत्तीच संपुष्टात आणण्याची सूचना ही प्रशासकीय सुधारणा ठरू शकते.

त्याचप्रमाणे एखाद्या अधिकाऱ्याकडून झालेला विलंब ही वैयक्तिक बाब असू शकते; परंतु एखाद्या सेवेसाठी अनावश्यक मंजुरीचा टप्पा राज्यभर अस्तित्वात असेल, तर तो टप्पा दूर करण्याची सूचना ही संरचनात्मक सुधारणा ठरू शकते.

थोडक्यात, व्यक्तीची समस्या सोडविण्यापेक्षा त्या समस्येला जन्म देणारी व्यवस्थेतील त्रुटीच दूर करणे, ही 'सुधारणा उत्सवा'ची मूलभूत भूमिका आहे.

### कमी कागदपत्रे... कमी फेऱ्या... अधिक गतिमान सेवा!

शासकीय सेवा मिळविताना नागरिकांचा वेळ वाचविणे, आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करणे, कार्यालयीन भेटी घटविणे, अनावश्यक मंजुरीच्या पातळ्या दूर करणे आणि प्रक्रियात्मक अडथळे कमी करणे, ही अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

डिजिटल माध्यमांचा अधिकाधिक वापर, विविध शासकीय प्रणालींमधील माहितीची परस्पर देवाणघेवाण, एकाच माहितीची किंवा कागदपत्रांची वारंवार मागणी टाळणे, उपलब्ध शासकीय डेटाचा प्रभावी वापर, आंतरविभागीय समन्वय वाढविणे, कालबाह्य किंवा अनावश्यक नियम व प्रक्रियांचे पुनरावलोकन करणे आणि निर्णयप्रक्रियेतील अनावश्यक टप्पे कमी करणे, या बाबींना अभियानात प्राधान्य देण्यात आले आहे.

यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सुधारणांची पुनरावृत्तीक्षमता. एखाद्या जिल्ह्यात, विभागात किंवा सेवेत केलेली सुधारणा परिणामकारक ठरली, तर ती अन्य जिल्हे, विभाग अथवा सेवांमध्ये लागू करता येईल का, याचे परीक्षण केले जाणार आहे. त्यामुळे एखाद्या गावातून किंवा जिल्ह्यातून आलेली साधी पण परिणामकारक सूचना भविष्यात राज्यव्यापी प्रशासकीय सुधारणेचा पाया ठरू शकते.



### 'जनमंथना'तून नागरिकांचा थेट सहभाग

'सुधारणा उत्सव'ाची संपूर्ण प्रक्रिया 'जनमंथन' (Discover), 'विमर्श' (Deliberate) आणि 'जन समाधान' (Deliver) या तीन प्रमुख टप्प्यांत राबविण्यात येणार आहे.

प्रथम नागरिकांकडून समस्या आणि सुधारणा जाणून घेणे, त्यानंतर प्राप्त सूचनांचा प्रशासकीय पातळीवर सखोल विचार करणे आणि शेवटी व्यवहार्य सुधारणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे, असा या प्रक्रियेचा प्रवास असेल.

२ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'जनमंथन' राबविण्यात येणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर किमान एक जनमंथन सभा आयोजित करण्याचे नियोजन असून आवश्यकतेनुसार नागरी भागातही तत्सम कार्यक्रम घेण्यात येतील.

२ ऑक्टोबर रोजी संबंधित लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त तसेच संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी किमान एका ग्रामसभा अथवा जनमंथन कार्यक्रमात सहभागी होऊन नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे अपेक्षित आहे.

नागरिकांकडून सुधारणा सूचना 'रिफॉर्म उत्सव' पोर्टल तसेच अधिकृत मदत कक्षामार्फत स्वीकारल्या जातील. प्रत्येक सूचनेची डिजिटल नोंदणी करून तिला स्वतंत्र क्रमांक दिला जाणार आहे. सूचना स्वीकारण्याची प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२ वाजता बंद होईल.

### प्रत्येक मागणी म्हणजे 'सुधारणा' नव्हे!

नागरिकांचा व्यापक सहभाग अपेक्षित असला तरी प्राप्त होणारी प्रत्येक मागणी सुधारणा म्हणून स्वीकारली जाणार नाही. प्रत्येक सूचनेची निश्चित निकषांनुसार छाननी केली जाईल.

सूचना सर्वसाधारण स्वरूपाची आहे का? ती समस्येच्या मूळ संरचनात्मक कारणावर उपाय सुचविते का? ती भविष्यलक्ष्यी आहे का? तिची अन्य ठिकाणी पुनरावृत्ती अथवा व्यापक अंमलबजावणी शक्य आहे का? ती रचनात्मक स्वरूपाची आहे का? या बाबी तपासल्या जातील.

वैयक्तिक तक्रारी, प्रलंबित वैयक्तिक प्रकरणांचे निराकरण, आक्षेपार्ह किंवा द्वेषपूर्ण मजकूर, स्पॅम अथवा अरचनात्मक सूचना, विशिष्ट ठिकाणी पायाभूत सुविधा उभारण्याच्या मागण्या, वैयक्तिक वेतन किंवा सेवाशर्तींतील बदल, विशिष्ट कर अथवा शुल्क बदलण्याच्या मागण्या, ठोस सेवा किंवा प्रक्रियेशी संबंध नसलेल्या राजकीय अथवा सर्वसाधारण घोषणा, आधीच अंमलबजावणीत असलेल्या बाबी तसेच न्यायप्रविष्ट विषय 'सुधारणा' म्हणून वर्गीकृत केले जाणार नाहीत.

मात्र एखाद्या तक्रारीतून शासनाच्या नियम, प्रक्रिया, तंत्रज्ञान किंवा संस्थात्मक व्यवस्थेतील सर्वसाधारण स्वरूपाची त्रुटी निदर्शनास येत असेल, तर त्या संरचनात्मक मुद्द्याचा स्वतंत्र सुधारणा सूचना म्हणून विचार केला जाऊ शकतो.

छाननीनंतर ग्राह्य ठरणाऱ्या सुधारणांचे Quick Wins, Medium-term Reforms आणि Structural Reforms अशा तीन प्रकारांत वर्गीकरण केले जाणार आहे. विद्यमान अधिकार, प्रक्रिया आणि उपलब्ध संसाधनांच्या चौकटीत अल्पावधीत अंमलात आणता येणाऱ्या सुधारणांचा समावेश 'Quick Wins'मध्ये होईल. प्रक्रिया बदल, शासन निर्णय, नियमांमधील सुधारणा, तांत्रिक बदल किंवा आंतरविभागीय समन्वय आवश्यक असलेल्या सूचना 'Medium-term Reforms'मध्ये समाविष्ट केल्या जातील.

तर कायदेशीर, धोरणात्मक, संस्थात्मक, तांत्रिक किंवा व्यापक आंतरविभागीय बदल आवश्यक असलेल्या सूचना 'Structural Reforms'मध्ये समाविष्ट केल्या जातील.

### 'विमर्शा'त सूचनांची प्रशासकीय कसोटी

१० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'विमर्श' टप्पा राबविला जाणार आहे. संबंधित प्रशासकीय विभाग प्राप्त सूचनांचे परीक्षण करून त्यांचे योग्य वर्गीकरण करतील.

एकापेक्षा अधिक विभागांशी निगडित, धोरणात्मक स्वरूपाच्या किंवा राज्यस्तरीय निर्णयाची आवश्यकता असलेल्या सुधारणांचा विचार राज्य समन्वय समितीच्या स्तरावर केला जाईल.

याचदरम्यान १० ऑक्टोबर ते २० डिसेंबर २०२६ या कालावधीतील 'जन समाधान' टप्प्यात शक्य तितक्या 'Quick Wins'ची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

मध्यमकालीन आणि संरचनात्मक सुधारणांसाठी स्वतंत्र अंमलबजावणी आराखडा तयार केला जाईल. त्यामध्ये संबंधित सुधारणा, अपेक्षित परिणाम, जबाबदार विभाग व अधिकारी, आवश्यक प्रशासकीय किंवा कायदेशीर बदल, तांत्रिक आवश्यकता, आर्थिक परिणाम, अंमलबजावणीची कालमर्यादा आणि परिणाम निर्देशकांचा समावेश असेल.

### बदल कागदावर नव्हे... नागरिकांच्या अनुभवात दिसायला हवा!

'सुधारणा उत्सवा'तील सर्वाधिक महत्त्वाचा पैलू म्हणजे परिणाम मोजमाप.

एखादा शासन निर्णय काढला किंवा कार्यपद्धतीत बदल केला म्हणजे सुधारणा पूर्ण झाली, एवढ्यापुरती या अभियानाची व्याप्ती नाही. त्या बदलामुळे नागरिकाच्या दैनंदिन व्यवहारात नेमका काय फरक पडला, याचेही मूल्यमापन केले जाणार आहे.

सेवा मिळण्यासाठी लागणारा कालावधी किती कमी झाला? आवश्यक कागदपत्रांची संख्या किती घटली? कार्यालयीन फेऱ्या किती कमी झाल्या? मंजुरीचे किती टप्पे वगळले गेले? अनुपालनाचा भार किती कमी झाला? डिजिटल सेवांचा वापर किती वाढला? प्रलंबित प्रकरणांत किती घट झाली? नागरिकांचे समाधान किती वाढले?

अशा परिणाम निर्देशकांच्या आधारे सुधारणेचे यश तपासले जाणार आहे.

म्हणूनच 'सुधारणा झाली' या प्रशासकीय नोंदीपेक्षा 'सुधारणेमुळे नागरिकाला काय मिळाले?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

### सूचनेपासून अंमलबजावणीपर्यंत डिजिटल मागोवा

नागरिकांकडून सूचना प्राप्त झाल्यापासून तिच्या अंतिम अंमलबजावणीपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे डिजिटल संनियंत्रण 'रिफॉर्म उत्सव' पोर्टल आणि डॅशबोर्डच्या माध्यमातून केले जाणार आहे. प्राप्त सूचनांची संख्या, जिल्हानिहाय व विभागनिहाय वर्गीकरण, ग्राह्य ठरलेल्या सुधारणा, Quick Wins, Medium-term Reforms, Structural Reforms, पूर्ण झालेल्या व प्रलंबित सुधारणा तसेच अंमलबजावणीची सद्यस्थिती यावर या माध्यमातून लक्ष ठेवले जाईल.

सूचनांच्या प्राथमिक वर्गीकरणासाठी आवश्यकतेनुसार कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांचा वापर करण्याचीही तरतूद आहे. मात्र ही प्रणाली केवळ सहाय्यक स्वरूपाची राहणार असून अंतिम निर्णय संबंधित अधिकृत अधिकारी किंवा विभागाकडूनच घेतला जाईल.

जिल्ह्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समिती (District Coordination Committee-DCC) गठित करण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पोलीस अधीक्षक, जिल्हा सहआयुक्त, नगरपालिका प्रशासन, जिल्हा माहिती अधिकारी, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचा सदस्य म्हणून समावेश असून जिल्हा नियोजन अधिकारी हे सदस्य सचिव आहेत.

याशिवाय निवासी उपजिल्हाधिकारी, आरोग्य, वन, कृषी, सार्वजनिक बांधकाम, जलसंधारण, न्यायालयीन प्रशासन, जात पडताळणी, वैद्यकीय शिक्षण, वीज वितरण, अन्न व औषध प्रशासन, भूमी अभिलेख, महिला व बालविकास, परिवहन, बँकिंग, सहकार तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आदी क्षेत्रांतील जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचा निमंत्रित सदस्य म्हणून सहभाग आहे.

जिल्ह्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे, जनमंथन कार्यक्रमांचे आयोजन करणे, नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करणे, प्राप्त सूचनांचे संकलन व प्राथमिक छाननी करणे, संबंधित विभागांमध्ये समन्वय साधणे, जिल्हास्तरीय संनियंत्रण करणे आणि राज्य नोडल अधिकाऱ्यांना प्रगती अहवाल सादर करणे, ही समितीची प्रमुख कार्यकक्षा राहणार आहे.

### माहिती व जनसंपर्क यंत्रणेची महत्त्वाची भूमिका

'सुधारणा उत्सव' केवळ प्रशासकीय फाईल किंवा सरकारी कार्यालयांपुरता मर्यादित राहिल्यास त्याचा अपेक्षित उद्देश साध्य होणार नाही. अधिकाधिक नागरिकांना अभियानाची संकल्पना समजणे आणि त्यांनी रचनात्मक सूचना मांडण्यासाठी पुढे येणे आवश्यक आहे.

त्यामुळे माहिती व जनसंपर्क यंत्रणेला अभियानात महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

राज्यस्तरावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालय संबंधित प्रशासकीय विभागांच्या समन्वयातून जनजागृती, प्रसार साहित्य, डिजिटल प्रचार, माध्यम व्यवस्थापन तसेच उल्लेखनीय सुधारणा आणि यशोगाथांच्या प्रसिद्धीसाठी आवश्यक कृती आराखडा तयार करणार आहे.

जिल्हास्तरावर स्थानिक प्रसारमाध्यमे, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि उपलब्ध अन्य माध्यमांचा प्रभावी वापर करून अभियान नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

### 'संकल्प सिद्धी'त मांडला जाणार बदलांचा लेखाजोखा

२५ ते २७ डिसेंबर २०२६ या कालावधीत राज्य आणि जिल्हास्तरावर 'संकल्प सिद्धी' कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

अभियानात किती सूचना प्राप्त झाल्या, किती सूचना सुधारणा म्हणून स्वीकारण्यात आल्या, किती सुधारणा प्रत्यक्ष अंमलात आल्या आणि त्यातून कोणते परिणाम साध्य झाले, याचा आढावा या कार्यक्रमांमध्ये घेतला जाणार आहे.

उत्कृष्ट सुधारणा आणि यशोगाथांचे सादरीकरण करण्याबरोबरच उल्लेखनीय योगदान देणारे नागरिक, अधिकारी, कर्मचारी आणि जिल्ह्यांचा गौरव करण्याचीही तरतूद आहे.

२८ डिसेंबर २०२६ पासून मध्यमकालीन आणि संरचनात्मक सुधारणांचा नियमित पाठपुरावा सुरू राहणार असून संबंधित विभागांना त्यांच्या अंमलबजावणीबाबत कृती अहवाल सादर करावे लागतील.

### नागरिक केवळ लाभार्थी नव्हे... सुधारणेतील भागीदार!

'सुधारणा उत्सवा'चे यश केवळ किती सूचना प्राप्त झाल्या, यावर मोजता येणार नाही. त्यापैकी किती व्यवहार्य सूचना प्रत्यक्ष बदलात रूपांतरित झाल्या आणि त्या बदलाचा नागरिकांच्या जीवनावर किती परिणाम झाला, हीच या अभियानाची खरी कसोटी ठरणार आहे.

एखादे प्रमाणपत्र मिळविताना एक कागदपत्र कमी लागले, एका मंजुरीचा अनावश्यक टप्पा संपुष्टात आला, दोन शासकीय कार्यालयांमधील माहिती नागरिकाने पुन्हा सादर न करता परस्पर उपलब्ध झाली किंवा एखाद्या सेवेसाठी कार्यालयाची एक फेरी वाचली, तरी व्यक्तिगत पातळीवरील हा छोटा बदल लाखो नागरिकांच्या संदर्भात मोठा प्रशासकीय परिणाम घडवू शकतो.

त्यामुळे 'माझी अडचण सोडवा' या अपेक्षेच्या पुढे जाऊन 'ही अडचण पुन्हा कोणत्याही नागरिकाला येऊ नये, यासाठी व्यवस्थेत काय बदल करता येईल?' असा प्रश्न विचारण्याची आणि त्याचे उत्तर शासनासमोर मांडण्याची संधी 'सुधारणा उत्सवा'तून नागरिकांना मिळणार आहे.

शासन आणि नागरिक यांच्यातील संवादाला तक्रारीपासून सुधारणेकडे आणि सुधारणेपासून प्रत्यक्ष परिणामाकडे नेण्याचा हा प्रयत्न आहे.

नागरिकांच्या अनुभवातून आलेल्या व्यवहार्य सूचनांकडे प्रशासनाने संवेदनशीलतेने पाहिले आणि त्यांचे कालबद्ध सुधारणांमध्ये रूपांतर केले, तर 'सुधारणा उत्सव' हा केवळ तीन महिन्यांचा प्रशासकीय उपक्रम न राहता नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि परिणामकारक प्रशासनाच्या कार्यसंस्कृतीकडे नेणारी दीर्घकालीन प्रक्रिया ठरू शकतो.

***जिल्हा माहिती कार्यालय, परभणी***

# कुत्र्याचा चावा छोटा असला तरी धोका मोठा; वेळीच उपचार हाच जीव वाचविण्याचा मार्ग

## जागतिक रेबीज दिनानिमित्त जिल्ह्यात विविध आरोग्य संस्थांमध्ये जनजागृती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** "Stronger Together – एकत्रितपणे अधिक सक्षम" या संकल्पनेनुसार जागतिक रेबीज दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांमध्ये रेबीजबाबत जनजागृती करण्यात आली. रेबीजपासून बचाव, पाळीव प्राण्यांचे नियमित लसीकरण आणि प्राण्याने चावा अथवा ओरखडा घेतल्यास तातडीने करावयाच्या उपाययोजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली.



मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने हा उपक्रम राबविला. जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत रेबीजसंदर्भातील अहवाल व सनियंत्रणाचे काम सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एस. शैलजा यांच्या नियंत्रणाखाली केले जाते. आरोग्य संस्थांकडून रेबीजसंदर्भातील माहितीचे संकलन, सनियंत्रण आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा आढावा घेण्यात येतो.

रेबीज हा विषाणूमुळे होणारा गंभीर आजार असून संक्रमित प्राण्याच्या लाळेतून त्याचा संसर्ग होऊ शकतो. कुत्रा हा मानवी रेबीज संसर्गाचा प्रमुख स्रोत आहे. त्यामुळे लहान मुलांनी कुत्र्यांना किंवा इतर प्राण्यांना विनाकारण चिडवू नये तसेच अनोळखी प्राण्यांपासून सुरक्षित अंतर ठेवावे, असे आवाहन करण्यात आले.

चावा किंवा ओरखडा झाल्यास १५ मिनिटे जखम धुवा

प्राण्याने चावा घेतल्यास किंवा ओरखडा झाल्यास जखम साबण आणि वाहत्या पाण्याने किमान १५ मिनिटे धुवावी. त्यानंतर विलंब न करता जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा. जखमेवर हळद, मिरची, चुना, माती, तेल, शेण किंवा कोणतेही घरगुती पदार्थ लावू नयेत. जखम छोटी आहे, रक्त आले नाही किंवा प्राणी पाळीव आहे, या गैरसमजांमुळे उपचारास विलंब करू नये.

वैद्यकीय तपासणीनुसार आवश्यक असल्यास रेबीज प्रतिबंधक लसीकरण केले जाते. गंभीर संपर्काच्या परिस्थितीत डॉक्टरांच्या सल्ल्याने रेबीज इम्युनोग्लोब्युलिन किंवा मोनोक्लोनल अँटीबॉडीज देण्यात येऊ शकतात. डॉक्टरांनी सांगितलेला लसीकरणाचा कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे.

पाळीव कुत्र्यांचे नियमित रेबीजविरोधी लसीकरण करून घेणे, त्यांची योग्य निगा राखणे आणि त्यांना नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे. कुत्र्याबरोबरच मांजर, माकड, वटवाघूळ किंवा इतर संशयित सस्तन प्राण्यांच्या चावा अथवा ओरखड्यालाही गांभीर्याने घ्यावे. रेबीजची लक्षणे दिसण्याची वाट न पाहता चावा किंवा ओरखडा झाल्यानंतर तातडीने प्रतिबंधात्मक उपचार घेणे महत्त्वाचे असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

"कुत्रा चावला तर घाबरू नका, पण दुर्लक्षही करू नका. १५ मिनिटे जखम धुवा आणि तातडीने आरोग्य केंद्रात जा," असे आवाहन आरोग्य विभागाने केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## बिडकीन येथे 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' सेवा पंधरवडा आयोजन-प्रशासन नागरीकांच्या पालावर



**बिडकीन प्रतिनिधी :** राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' अंतर्गत भटक्या विमुक्त जातीच्या नागरिकांना विविध प्रमाणपत्रे वाटप करण्याच्या अनुषंगाने बिडकीन येथील रामनगर वस्तीवर दि २७ सप्टेंबर रोजी जाऊन प्रशासनाने विशेष सेवा शिबिर घेतले आले.या शिबिराला ५१३ नागरिकांनी उपस्थिती नोंदवला यावेळी नागरिकांच्या शिधापत्रिका, जन्म-मृत्यू दाखला, जात व उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेअर, रहिवासी दाखला, विवाह नोंदणी, दिव्यांग प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड , श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, प्रधानमंत्री आवास योजना व पीएम-किसान योजनेसह विविध शासकीय योजनांचे प्रलंबित अर्ज व तक्रारींचे निवारणासह विविध अर्ज स्वीकारण्यात आले. दरम्यान यापूर्वी अर्ज केलेल्या नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.शिबिराचे आयोजन जिल्हास्तरीय विमुक्त जाती, भटक्या जमाती समितीचे अशासकीय सदस्य गणेश काळे (जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर ) तालुका अशासकीय सदस्य चरणसिंह राठोड, यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार सतीश पेंडसे , मंडळ अधिकारी रविंद्र जोशी, तलाठी रवींद्र मुखेडे, ग्रामविकास अधिकारी अरुण गोर्डे , बहुजन कल्याण विभागाचे कृष्णा बढे , नेरकर , आदींसह महसूल, पुरवठा, ग्रामपंचायत व विविध विभागांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत ग्राम आरोग्य व पोषण दिवसाचे आयोजन

### गर्भवती व स्तनदा मातांना आरोग्य व पोषणाचे धडे



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र (UHWC), कर्णपुरा आणि अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच ग्राम आरोग्य व पोषण दिवस (VHND) अत्यंत उत्साहात आयोजित करण्यात आला. या विशेष कार्यक्रमाच्या माध्यमातून परिसरातील गर्भवती व स्तनदा मातांना आरोग्याबाबत आणि संतुलित पोषणाविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान तज्ज्ञांनी गर्भवती मातांना गर्भावस्थेत स्वतःची व बाळाची घ्यावयाची काळजी, नियमित आरोग्य तपासणीसाठी आरोग्य संस्थेला भेटी देण्याचे महत्त्व आणि गर्भावस्थेत उद्भवू शकणाऱ्या संभाव्य धोके किंवा जोखमींची लक्षणे याविषयी मोलाची माहिती दिली. तसेच, गर्भावस्था व प्रसूतीनंतरच्या काळात आवश्यक असणारा पौष्टिक व संतुलित आहार, शरीरातील रक्ताची कमतरता (ॲनिमिया) दूर करण्याचे उपाय आणि प्रतिबंधात्मक उपायांवर भर देण्यात आला. याशिवाय, माता व बालकांच्या आरोग्यासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देऊन पात्र महिलांनी या सर्व योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले. उपस्थितांच्या आरोग्याला प्राधान्य देत कार्यक्रमाच्या यशस्वीर्तेतर्गत उपस्थित गर्भवती व स्तनदा मातांना पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्णपुरा नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी नागे, स्टाफ नर्स मनीषा उबाळे, कटक मंडळ येथील स्टाफ नर्स, तसेच अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माहिती अधिकार अर्जांची नागरिकांना विहित मुदतीत अचूक माहिती देण्याचे आवाहन

### माहिती अधिकार दिनाचे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता /परभणी

**परभणी:** शासकीय कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी माहितीच्या अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा मजबूत स्तंभ असून, सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी माहिती अधिकाराच्या अर्जांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून नागरिकांना विहित मुदतीत अचूक व वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी अनिता भालेराव यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज, सोमवार (दि. २८) रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अनिता भालेराव, प्र. तहसीलदार (महसूल) गणेश पोलास, नायब तहसीलदार (सामान्य प्रशासन) अपर्णा दुधारे तसेच कार्यालयातील सहायक जनमाहिती अधिकारी व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

माहिती अधिकार अर्जांची हाताळणी करताना नागरिकांना आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून देणे, अर्जांवर नियमानुसार कार्यवाही करणे तसेच माहिती देताना अचूकता व पारदर्शकता राखणे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माहितीचा अधिकार अधिनियमातील विविध कलमे, त्याअनुषंगाने असलेली परिपत्रके आणि शासकीय कार्यालयांनी करावयाची कार्यवाही याबाबतही उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली. माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शासकीय कामकाज अधिक पारदर्शक व नागरिकाभिमुख होण्यास मदत होते, असे उपजिल्हाधिकारी अनिता भालेराव यांनी सांगितले. कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहायक गणेश तायडे यांनी माहितीचा अधिकार कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

## माय युपीआय सादर केले

**मुंबई :** नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ची पूर्ण मालकीची उपकंपनी एनपीसीआय भीम सर्व्हिसेस लिमिटेड (एनबीएसएल) ने आज भीम पेमेंट्स ॲप वर संवादात्मक एआई-आधारित सहाय्यक माययुपीआय सादर केल्याची घोषणा केली. माययुपीआय हे भीम वापरकर्त्यांसाठी त्यांच्या युपीआय -संबंधित गरजांसाठी २४/७ बहुभाषिक आणि सोपे सहाय्य उपलब्ध करून देते. यामुळे पेमेंट अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि व्यवस्थापित करणे सुलभ होण्यास मदत होते.

## सेवा संकल्प अभियाना'ला जिल्हाभर उत्स्फूर्त प्रतिसाद

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह स्वच्छता, आरोग्य, योग, माहिती अधिकार व जनजागृतीपर विविध उपक्रम

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभण:** मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' दि. 17 ऑक्टोबर 2026 पर्यंत राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील शाळा, ग्रामपंचायती आणि विविध ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे तसेच सामाजिक जनजागृती करणारे विविध उपक्रम उत्साहात सुरु आहेत. चित्रकला, क्रीडा स्पर्धा, प्रश्नमंजुषा, आनापान, योगासने, प्राणायाम, आरोग्य तपासणी, स्वच्छता व माहिती अधिकार दिनानिमित्त जनजागृती अशा विविध उपक्रमांना नागरिक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

टाकळी कुंभकर्ण येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी आनापान उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना एकाग्रता, मनःशांती व सकारात्मक विचार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

वागदरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'स्वप्नातील भारत' आणि 'माहितीचा अधिकार' या विषयांवर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यावेळी केंद्रप्रमुख श्री. नागरगोजे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी चित्रांच्या माध्यमातून विकसित भारताची संकल्पना तसेच नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराचे महत्त्व मांडले.

सांगळेवाडी येथील प्राथमिक शाळेत चित्रकला व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच माहिती अधिकार दिन साजरा करून विद्यार्थ्यांना माहितीच्या अधिकाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.लोहगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत 'विकसित भारत' या विषयावर चित्रकला स्पर्धा तसेच प्राणायाम व योगासनांचा उपक्रम घेण्यात आला. योगशिक्षिका कु. शरयू यादव यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामाचे मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामविकास अधिकारी श्री. दुधाटे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप केले.

सिंगणापूर केंद्रशाळेत सेवा संकल्प अभियानांतर्गत केंद्रस्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध सामाजिक व राष्ट्रीय विषयांवरील कल्पना चित्रांमधून साकारल्या.

मसला तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माहिती अधिकार दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना माहिती अधिकाराच्या उद्देशाबाबत व नागरिकांच्या अधिकारांबाबत माहिती देण्यात आली.

अभियानांतर्गत उखळी व पोहेडूळ परिसरात आरोग्य तपासणी शिबिर, तर वणीसंगम, करम आदी ठिकाणी परिसर स्वच्छता व कीटकनाशक फवारणीचे उपक्रम राबविण्यात आले. बोंदरगाव ग्रामपंचायतीच्या वतीने जलस्रोतांची स्वच्छता करण्यात आली. तसेच वडगाव, दुधगाव व शिर्शी बुद्रूक येथे योगासने व इतर जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले.

जिंतूर तालुक्यातील घागरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच कौसडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतही सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले. शाळा व ग्रामस्तरावर आयोजित या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आरोग्यविषयक जागरूकता, सामाजिक बांधिलकी आणि नागरिकांच्या अधिकारांविषयीची जाणीव वृद्धिंगत होत आहे.'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून शाळा आणि ग्रामस्तरावर विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच सामाजिक जनजागृतीला चालना देण्यात येत आहे.

## अधिकाऱ्यांना मुख्यालयी राहणे अनिवार्य : संजयसिंह चव्हाण

### विनापरवानगी मुख्यालय सोडल्यास शिस्तभंगासह आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार कारवाई

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी:** जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेता दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना गती देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रशासकीय यंत्रणा अधिक गतिमान केली आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी व नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी काही विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी पूर्णवेळ उपस्थित राहून कर्तव्य बजावण्याचे सक्त निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष संजयसिंह चव्हाण यांनी दिले आहेत.

दुष्काळी परिस्थितीत पाणीटंचाई, चाराटंचाई, पिकांचे नुकसान तसेच शेतकऱ्यांच्या विविध अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रशासनाच्या क्षेत्रीय यंत्रणेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे दुष्काळ निवारण, पीक पाहणी, शेतकरी सहाय्य, कर्ज पुनर्गठन तसेच शासनाच्या विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महसूल, कृषी, ग्रामविकास, पोलीस, नगरविकास, भूमी अभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, जलसंधारण आदी विभागाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून कामांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दुष्काळी परिस्थिती संपेपर्यंत संबंधित जिल्हा व तालुकास्तरीय क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. कोणत्याही प्रकारची रजा घेण्यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. अतितातडीच्या वैद्यकीय रजेला यामध्ये सुट देण्यात आली आहे. रजेचा अर्ज सबळ कारणांसह संबंधित विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा लागणार आहे. केवळ आपल्या मूळ प्रशासकीय प्रमुखांकडून रजा मंजूर करून घेऊन मुख्यालयात गैरहजर राहता येणार नसल्याचे जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजेवर जाणे, परस्पर रजा वाढवून घेणे किंवा मुख्यालयी अनुपस्थित आढळणे याची गंभीर दखल घेण्यात येणार आहे. अशा प्रकरणांमध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ मधील तरतुदींनुसार प्रशासकीय शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित कर्तव्यात कसूर, आदेशाचे उल्लंघन किंवा आपत्ती निवारण कार्यात अडथळा निर्माण झाल्याचे आढळल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील लागू तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल, असे निर्देशात नमूद करण्यात आले आहे.

## राजकुंवर महाविद्यालयात क्रांतिवीर भगतसिंग जयंती साजरी

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर राजकुंवर महाविद्यालय, फर्दापूर येथे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि देशभक्तीपर उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी भगतसिंग यांच्या अद्वितीय त्याग शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचे स्मरण करत त्यांच्या विचारांना सर्व उपस्थितांकडून विनम्र अभिवादन करण्यात आले



या प्रेरणादायी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा एन एस शेळके उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ ए जे बेडवाल यांनी भूषवले

तरुणांनी भगतसिंगांचा ध्येयवाद अंगीकारावा

यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्रांतिवीर भगतसिंग यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला आजच्या तरुण पिढीने भगतसिंगांचे प्रखर देशप्रेम त्यांचा ध्येयवाद उच्च विचार आणि देशासाठी केलेला सर्वोच्च त्याग यापासून प्रेरणा घेणे हीच काळाची गरज आहे असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन वक्त्यांनी केले या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा योगेश पाटील प्रा गजानन पाटील प्रा सुनील बिराडे प्रा एम बी शिंदे प्रा सपकाळे प्रा राजपूत प्रा मानकर प्रा सोनवणे प्रा राऊत प्रा तडवी आणि प्रा सोनवणे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## 'मित्रांगण'तर्फे सेवानिवृत्त वर्गमित्रांचा सपत्नीक सत्कार

### स्नेहमेळाव्यात वृक्षारोपणातून निसर्गसंवर्धनाचा संदेश; 'मित्रांगण फाऊंडेशन'च्या लघुपुस्तिकेचे प्रकाशन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

शालेय जीवनातील मैत्रीची नाळ वर्षानुवर्षे जपणाऱ्या बळीराम पाटील विद्यालयाच्या इयत्ता दहावी, बॅच १९८६ मधील माजी विद्यार्थ्यांच्या 'मित्रांगण' ग्रुपतर्फे श्री गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. 'अंगत-पंगत' अर्थात डबा पार्टीच्या निमित्ताने एकत्र आलेल्या वर्गमित्रांनी सेवानिवृत्त झालेल्या प्रकाश सोनवणे व विजय सोळुंके यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रकाश सोनवणे यांचा त्यांच्या पत्नी संगीता सोनवणे यांच्यासह सपत्नीक सत्कार करण्यात आला.

२७ सप्टेंबर रोजी झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे रेशीम उद्योग विभागाचे निवृत्त उपमहासंचालक दिलीपजी हाके प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'मित्रांगण'चे ॲडमिन तथा 'मित्रांगण फाऊंडेशन'चे संस्थापक महेंद्र टंगसाळे होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

मैत्रीबरोबरच सामाजिक बांधिलकीचा धागा अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने दोन्ही सत्कारमूर्ती तसेच प्रमुख पाहुणे दिलीप हाके यांना झाडांची रोपे भेट देण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून 'मित्रांगण फाऊंडेशन'ने निसर्गसंवर्धनाचा संदेश दिला.

सत्काराला उत्तर देताना प्रकाश सोनवणे यांनी सेवानिवृत्तीनंतर वेळ उपलब्ध झाल्याने 'मित्रांगण'च्या विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्याची तसेच आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी विद्या मुळे यांनी प्रास्ताविक केले. नंदा पठाडे, चंद्रकिशोर राऊत, अंबादास सोनवणे आणि चंद्रकांत अव्हाड यांनी मनोगत व्यक्त करत जुन्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला.

प्रमुख पाहुणे दिलीपजी हाके यांनी 'मित्रांगण'च्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. बदलत्या जीवनशैलीतही वर्गमित्रांमधील मैत्री आणि एकजूट टिकवून ठेवण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यासोबतच रेशीम उद्योगाचे स्वरूप, त्याची व्याप्ती आणि उपलब्ध संधी याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी 'मित्रांगण फाऊंडेशन'च्या कार्याची माहिती देणाऱ्या लघुपुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती भोसले यांनी प्रभावीपणे केले. उत्कृष्ट सूत्रसंचालनाबद्दल अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. मनोज लोहाडे यांनी आभार मानले.

या स्नेहमेळाव्यास अंकुश दानवे, चंद्रकिशोर राऊत, चंद्रकांत अव्हाड, नंदा पठाडे, कल्पना शेषवरे, विद्या महाजन, मनोज वैद्य, मनोज लोहाडे, उषा कांबळे, गोविंद लवांडे, अंबादास सोनवणे, समाधान सुरडकर, योगेश वडगावकर, सुनील उदावंत, संजय फरकाडे, नितीन जाधव, सतीश देशपांडे, बाबासाहेब काळे, राजेंद्र पवार, अशोक काळे, प्रवीण गोरे, साधना तळेकर, मीरा सरोदे यांच्यासह अनेक वर्गमित्र-मैत्रिणी व त्यांचे परिवार उपस्थित होते.

## उरण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा




हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांवर प्रेरित होऊन युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना समाजासाठी कार्यरत आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने युवकांनी प्रयत्न करावेत तसेच समाजाभिमुख दृष्टिकोनातून कार्य करावे असे सांगितले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे माजी रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.तुलसीदास मोकल ( सी डी देशमुख महाविद्यालय, रोहा) हे उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे, राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका, राष्ट्रीय सेवा योजनेत होणारी विविध उपक्रम तसेच त्यातून विद्यार्थ्यांना होणारे फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. व राष्ट्र उभारणीत राष्ट्रीय योजनेचे महत्त्व असल्याचे विशद केले. कार्यक्रमात वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ.पराग कारुलकर व डॉ. एम.जी. लोणे उपस्थित होते. सूत्रसंचालन राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ. हनुमंत जगताप यांनी व्यक्त केले. विनिता तांडेल व दिपू यादव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नूर युनानी क्लिनिकमध्ये ॲक्युपंक्चर व कायरोप्रॅक्टिक तज्ञांचा आरोग्य तपासणी कॅम्प




**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवणा येथे डॉ. अजीम कुरेशी यांच्या नूर युनानी क्लिनिकच्या वतीने ॲक्युपंक्चर अँड कायरोप्रॅक्टिक तज्ञांचा विशेष आरोग्य तपासणी कॅम्प आयोजित करण्यात आला. या कॅम्पला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कॅम्पदरम्यान विविध आजार व शारीरिक त्रास असलेल्या सुमारे ५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. रुग्णांना त्यांच्या तक्रारीनुसार आवश्यक मार्गदर्शन तसेच उपचाराबाबत माहिती देण्यात आली. विशेषतः शरीरातील वेदना, सांधेदुखी, पाठदुखी, मणक्यांशी संबंधित त्रास आदी समस्यांबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. या आरोग्य कॅम्पसाठी डॉ. एम. एस. चिश्ती, औरंगाबाद हे उपस्थित होते. त्यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. नागरिकांनी अशा आरोग्यविषयक उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. हा कॅम्प डॉ. अजीम कुरेशी यांच्या नूर युनानी क्लिनिकच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल रुग्णांनी आयोजकांचे आभार मानले.

## गणेश महोत्सव विविध महाजन जागृती अभियान संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**गौरक्षक सेना वीर वारकरी सेवा संघ परभणी कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी प्रणित राष्ट्र जन फाउंडेशन सार्वजनिक गणेश महोत्सव 2026 वतीने गणेश महोत्सवाच्या निमित्ताने गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्थी महोत्सवामध्ये विविध ठिकाणी महाजन जागृती अभियान यामध्ये जल है तो कल है पाणी बचाव देश बचाव ,गोमाता नंदीबैल बचाव गोसंवर्धन जनजागृती अभियान, गोमय गणपती गो गोमय गणेश महोत्सव साजरी करण्याची संकल्पना करा जनजागृती डीजे मुक्त अभियान व वारकरी आध्यात्मिक धार्मिक वारकरी संप्रदाय भजन स्वरूपात मिरवणूक काढा जर जागृती अभियान , शेतकरी राजा बळीराजा किसान आत्महत्या करू नका शेतकरी वाचला तरी भारत टिकेल, वृक्ष लागवड करा झाडे लावा झाडे जगवा वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी चराचरी जनजागृती, स्वच्छ शहर स्वच्छ गाव स्वच्छता जनजागृती अभियान, अन्नदान करा अन्न हे पूर्णब्रह्म आहे हे समजून कुठेही अन्नदान करा त्यांच्या कृती अभियान, सर्व समाज बांधव एकता चा संदेश जनजागृती अभियान , सामाजिक धार्मिक अध्यात्मिक आरोग्य शिबिर असे विविध समाज हिताचे उपक्रम घ्या महाजन जागृती अभियान अशा अनेक मागील 2015 पासून वीर वारकरी सेवा संघ महा जन जागृती अभियान प्रमुख गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर यांच्या पुढाकारातून गणेश उत्सवात विविध ठिकाणी जनजागृती अभियान राबविण्यात आले तर याही वर्षी परभणी शहरात जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध समाज प्रबोधनाच्या माध्यमातून सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली संस्कृती टिकली पाहिजे गणेशोत्सव हा सर्वात मोठा उत्सव थाटामाटा साजरा करण्याची संकल्पना या जनजागृतीच्या माध्यमातून करण्यात येते कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी चे चेअरमन गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर, बालकलाकार रितेश आवटे पाटील रुद्राक्ष आवटे पिंपळाकर विविध मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया पुढच्या वर्षी लवकर या एक दोन तीन चार गणपतीचा जयजयकार एकच मोहीम महा जनजागृती अभियान अशी माहिती राष्ट्र जन फाउंडेशन गणेश महोत्सव संस्थापक अध्यक्ष सांस्कृतिक कलावंत नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

## पोवा 8 5जीमध्ये पोवाचा लोकप्रिय ऑरेंज रंग पुन्हा चर्चेत

**नवी दिल्ली:** पोवा ८५जी ला 'प्लाझ्मा ऑरेंज' रंगासह एक नवीन लूक मिळाला आहे, ज्यामुळे त्याच्या आकर्षक डिझाइनला एक ताजी आणि चैतन्यमय ओळख मिळाली आहे. हा रंग फोनचे स्वरूप अधिक आकर्षक बनवतो आणि त्याच्या अद्वितीय पोवा ट्रायअँगल कॅमेरा मॉड्यूल व इंटरॅक्टिव्ह 'अलाइव्ह मॅट्रिक्स डिस्प्ले' सोबत उत्तम जुळतो. फोनच्या मागील बाजूस असलेला डिस्प्ले त्याच्या डिझाइनमध्ये आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण घटक जोडतो. तो नोटिफिकेशन्स, बॅटरी स्टेटस आणि टायमर दाखवतो, आणि जेव्हा फोन उलटा ठेवला जातो (स्क्रीन-साइड खाली), तेव्हा तो डेस्क क्लॉक म्हणूनही काम करतो.

## 'माय सिटी' फिल्म कॅटेगरीचाही समावेश

**नवी दिल्ली :** स्मार्टफोन ब्रँड वीवोने नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिववर्क्सच्या सहकार्याने वीवो इमेजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवॉर्ड्सच्या चौथ्या पर्वाची घोषणा केली आहे. 'आपली जिज्ञासा तुम्हाला कुठे घेऊन जाते?' या थीमअंतर्गत देशभरातील फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफीप्रेमींना स्मार्टफोनच्या माध्यमातून सर्जनशीलता आणि व्हिज्युअल स्टोरीटेलिंग सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दूध संघाच्या सभेत 34 लाखांच्या घोटाळ्यावरून गदारोळ; कर्मचाऱ्याच्या निलंबनाची मागणी

### ८७.६९ लाख नफा, दूध उत्पादकांना ४० पैसे बोनस

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महानंदच्या दहा दूध विक्री बूथच्या भाड्यापोटी मिळणारी रक्कम २०११ पासून परस्पर खात्यावर वळवून ३४ लाखांचा अपहार केल्याचा आरोप असलेल्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याच्या मागणीवरून जिल्हा दूध संघाच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी चांगलाच गदारोळ झाला. कर्मचाऱ्याच्या निलंबनाची मागणी सभासदांनी लावून धरली. खासदार डॉ. कल्याण काळे यांनीही संबंधितावर कारवाईची मागणी केल्यानंतर वातावरण काहीसे निवळले. हे प्रकरण जिल्हा उपनिबंधकांकडे न्यायप्रविष्ट असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दूध संघाला गतवर्षी ८७ लाख ६९ हजार रुपयांचा नफा झाला असून, दूध उत्पादकांना प्रतिलिटर ४० पैसे बोनस देण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला.




छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या अधिमंडळाची ६६ वी सर्वसाधारण सभा सोमवारी (२८) बीड बायपास रोडवरील सावित्री लॉन्स येथे झाली. अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत, उपाध्यक्ष दिलीप निरपळ, खासदार डॉ. कल्याण काळे, संचालक नंदलाल काळे, शिलाबाई कोळगे, सुमित्रा चोपडे, इंदुबाई सुरडकर, रमेश पाटील डोणगावकर, राजेंद्र पाथ्रीकर, कचरू डिके पाटील, संदीप बोरसे, अलका पाटील डोणगावकर, दामोधर नवपुते, राधाकिसन पठाडे, श्रीराम शेळके, सोमीनाथ चव्हाण तसेच व्यवस्थापकीय संचालक सुरेश पहाडिया यांची उपस्थिती होती.

सभेत देवगिरी महानंदच्या दहा बूथच्या भाड्याची रक्कम परस्पर खात्यावर वळविल्याचा मुद्दा निघाला. पालखेडचे नंदकिशोर जाधव आणि गेवराईचे राहुलकुमार ताठे यांनी संबंधित कर्मचाऱ्याला निलंबित करण्याची मागणी केली. बहुतांश सभासदांनी त्यांना पाठिंबा दिल्याने सभेत काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. खासदार काळे यांनीही कारवाईची मागणी केली. त्यानंतर अध्यक्ष व उपाध्यक्षांनी हे प्रकरण सहकारी संस्थांच्या (दुग्ध) जिल्हा उपनिबंधकांकडे न्यायप्रविष्ट असल्याचे सांगितले.

**एमडींना सभासदांच्या प्रश्नांचा भडिमार**

व्यवस्थापकीय संचालक सुरेश पहाडिया विषय मांडत असताना सभासद आणि दूध संस्थांच्या अध्यक्षांनी विविध प्रश्न उपस्थित केले. बिडकीन येथील सभासदाने चार वेळा अर्ज करूनही पॅकेजिंग साहित्य मिळत नसल्याची तक्रार केली. दूध संघाकडून वर्षाला सुमारे १७ हजार किलो पनीरची विक्री होत असताना आपण ८ ते ९ हजार किलो पनीर विक्री करतो, तरीही विक्रेत्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच व्हॉट्सअॅप समूहातून काढून टाकल्याची तक्रारही त्यांनी केली. यावर अध्यक्ष राजपूत यांनी अडचणी सोडविण्याचे आश्वासन दिले.

**एनडीडीबी केंद्रावरील उपस्थितीवर सवाल**

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यवस्थापकीय संचालक पहाडिया यांना विविध मुद्द्यांवर धारेवर धरले. राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड आणि जिल्हा दूध संघ व्यावसायिकदृष्ट्या स्पर्धक असताना एनडीडीबीच्या दूध विक्री केंद्रावर व्यवस्थापकीय संचालक कसे उपस्थित राहू शकतात, असा सवाल त्यांनी केला. यावर पहाडिया यांनी संचालक मंडळाला पत्र देऊन तेथे राहण्याबाबत विचारणा केल्याचे सांगितले.

**बाटलीबंद दूध विक्री बंद का?**

रेल्वेच्या विक्री केंद्रावर देवगिरी महानंदचे बाटलीबंद दूध विक्री बंद का करण्यात आले, अशी विचारणाही काळे यांनी केली. मात्र, त्यावर समाधानकारक उत्तर मिळाले नाही. जिल्हा दूध संघाचे दूध संकलन सातत्याने घटत असून, शेतकरी सभासदांना पुरेसा दर देण्यात अडचणी येत असल्याचे काळे यांनी सभेत सांगितले.

दरम्यान, २०२४-२५ मध्ये प्रतिदिन ६८ हजार लिटर

असलेले दूध संकलन २०२५-२६ मध्ये ६० हजार लिटरवर आले आहे. खासगी संस्थांचे दूध संकलन वाढत असताना जिल्हा दूध संघाचे संकलन घटत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. दूध उत्पादकांना दरवाढ देण्यास विलंब का होतो, तसेच दूध संघाला केवळ ८७ लाख रुपयांचाच नफा कसा झाला, असा सवालही त्यांनी केला.

अखेर अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी दूध उत्पादकांना प्रतिलिटर ४० पैसे बोनस आणि दूध संस्थांना १० पैसे दरवाढ देण्याची घोषणा केली. भावफरकाच्या मुद्द्यावर सभासदांनी पुन्हा गोंधळ सुरू केल्यानंतर अध्यक्षांनी राष्ट्रगीताचा एकच चरण घेऊन सभेची सांगता केली.

**सर्वाधिक दूध पुरवठा करणाऱ्या संस्थांचा गौरव**

सभेत सर्वाधिक दूध पुरवठा करणाऱ्या वैष्णवी दूध उत्पादक संस्था, चापानेर, जय बजरंग दूध उत्पादक संस्था आणि जय लक्ष्मी सहकारी दूध उत्पादक संस्था, पळशी यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# हॉकी महाराष्ट्रच्या कार्यकारिणीवर डॉ. केजल भारसाखळे

### महिला हॉकीला व्यापक व्यासपीठ देण्यासह खेळाडूंच्या सर्वांगीण विकासावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण, क्रीडा आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. केजल भारसाखळे यांची हॉकी महाराष्ट्रच्या कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे छत्रपती संभाजीनगरला राज्यस्तरीय हॉकी संघटनेच्या कार्यकारिणीत प्रतिनिधित्व मिळाले आहे.

डॉ. भारसाखळे या एईव्हीपीएम महिला महाविद्यालयाच्या संचालिका असून, महिला आणि युवकांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत. महिलांना क्रीडा क्षेत्रात अधिकाधिक संधी मिळाव्यात, या उद्देशाने त्यांनी 'असोसिएशन फॉर वुमेन इन स्पोर्ट्स' (एडब्ल्यूआयएस) ची स्थापना केली आहे. या माध्यमातून महिला खेळाडूंना मार्गदर्शन, खेळाडू विकास, क्रीडा मानसशास्त्र तसेच विविध क्रीडा उपक्रम राबविले जातात.

हॉकी महाराष्ट्रच्या कार्यकारिणीवर काम करताना महिला हॉकीला अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यावर त्यांचा भर राहणार आहे. 'महिला हॉकी लीग'सारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासोबतच मुली आणि मुलांच्या खेळाडूंसाठी समुपदेशन, करिअर मार्गदर्शन आणि खेळाडू सहाय्य सेवा विकसित करण्याचा त्यांचा मानस आहे. खेळाडूंचे मानसिक स्वास्थ्य, पोषण, तंदुरुस्ती, शिक्षण आणि करिअर या बाबींकडेही एकत्रितपणे लक्ष देण्याची दिशा त्यांनी मांडली आहे.



"केवळ मैदानावर खेळाडू घडविणे नव्हे, तर त्यांना मैदानाबाहेरही सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि भविष्यासाठी तयार करणे, हा माझा प्रयत्न असेल," अशी भावना डॉ. केजल भारसाखळे यांनी व्यक्त केली.

**हॉकी महाराष्ट्रच्या कार्यकारिणीची निवड**

हॉकी महाराष्ट्रच्या निवडणुकीत अध्यक्षपदी ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी कृष्ण प्रकाश यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी मनीषा आकेरे, रमेश पिल्ले आणि गुरमीतसिंग नवाब, सरचिटणीसपदी मनोज भोरे, खजिनदारपदी कैलास सोनार, तर सहसचिवपदी महेश खुताळे आणि पूनम दुर्गे यांची निवड झाली आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. केजल भारसाखळे यांच्यासह रुपेश चव्हाण, मनोजा गोस्वामी आणि शेख फारुख यांची निवड करण्यात आली आहे. अॅथलिट्स प्रतिनिधी म्हणून ऑलिम्पियन विक्रम पिल्ले आणि ऑलिम्पियन हेलन मेरी, तर सहयोगी उपाध्यक्ष म्हणून आमदार संदीप जोशी आणि नगरसेवक मनीष आनंद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. भारसाखळे यांच्या निवडीचे क्रीडा, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातून स्वागत होत आहे.

# जागतिक रेबीज दिनानिमित्त 30 पाळीव प्राण्यांना मोफत लसीकरण

### मनपा पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम; पशुपालकांना परवाना काढण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** जागतिक रेबीज दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागातर्फे बाजीपुरा येथील पशुचिकित्सालयात पाळीव प्राण्यांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधक लसीकरण शिबिर घेण्यात आले. या उपक्रमात श्वान, मांजर तसेच अन्य पाळीव प्राण्यांसह एकूण ३० प्राण्यांचे मोफत लसीकरण करण्यात आले.

रेबीजपासून पाळीव प्राण्यांचे संरक्षण करण्यासोबतच नागरिकांमध्ये या आजाराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिराला उपस्थित पशुपालकांना पाळीव प्राण्यांचे वेळेवर रेबीज




प्रतिबंधक लसीकरण करून घेण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच महानगरपालिकेच्या नियमानुसार पाळीव प्राण्यांचा परवाना काढणे आवश्यक असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी काही पशुपालकांचे परवान्यासाठीचे ऑनलाइन अर्जही तातडीने भरून घेण्यात आले.

पाळीव प्राण्यांना वेळेवर रेबीज प्रतिबंधक लस देणे आणि त्यांचा महानगरपालिकेकडे नियमानुसार परवाना काढणे, याबाबत नागरिकांनी गांभीर्याने पुढाकार घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले.

पशुसंवर्धन विभागाचे विभागप्रमुख विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी अनंत जाधव, प्र. पशुवैद्यकीय अधिकारी, पशुधन अधिकारी शेख शाहेद आणि फिरोज खान यांच्या उपस्थितीत पशुचिकित्सालय, बाजीपुरा येथे हा उपक्रम राबविण्यात आला.

# नंदापूर येथे भारत माता मंदिराचा भव्य लोकार्पण सोहळा

### हिंदू संस्कृती ची जोपासना करुन धर्मकार्यात सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे - महंत सुदर्शन जी कपाटे

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी :** नंदापूर येथे ह.भ.प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'भारत माता मंदिरा'चा भव्य-लोकार्पण सोहळा सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.




या सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानुभाव पंथाच्या वतीने छत्रपती संभाजी नगर पैठण रोड श्रीकृष्ण मंदिर मानभाव आश्रम सुदर्शन नागराजबाबा कपाटे यांच्या प्रमुख उपस्थिती हजारो भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाला

भारत माता मंदिराच्या माध्यमातून राष्ट्रभक्ती, संस्कार, सामाजिक एकात्मता आणि भारतीय संस्कृतीची प्रेरणा समाजामध्ये अधिक दृढ होण्यास निश्चितच हातभार लागेल, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या कार्यक्रमास संघ प्रचारक श्रीमान हेमंतजी, रा. स्व. संघ, तसेच धनशामजी गोयल, उद्योजक, जालना यांची प्रमुख उपस्थिती होती. समस्त गावकरी मंडळी, नंदापूर जिल्हा जालना यांच्या वतीने या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. होते

जय भारत माता! की जय!" या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

# अजिंठा : एसटीची अवजड ट्रेलरला पाठीमागून जोरदार धडक; २५ प्रवासी जखमी; ब्रेक निकामी झाल्याचा चालकाचा दावा

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर

अजिंठा येथील मुख्यपाठ फाट्याजवळ पोखळेन घेऊन जाणाऱ्या अवजड ट्रेलरला पाठीमागून एसटी महामंडळाच्या बसने जोरदार धडक दिली. ही घटना सोमवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या दरम्यान घडली. या अपघातात बसमधील सुमारे २५ प्रवासी जखमी झाले. काही प्रवाशांच्या डोक्याला, नाकाला, हाताला आणि पायाला दुखापत झाली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.




छत्रपती संभाजीनगरकडून जळगावकडे जाणारी एसटी बस (एमएच ०६ बीडब्ल्यू १२३५) मुख्यपाठ फाट्याजवळ आली असता पोखळेन घेऊन जाणाऱ्या अवजड ट्रेलरला (एनएल ०१ एल ७६५५) बसने पाठीमागून जोरदार धडक दिली. अचानक झालेल्या या धडकेमुळे बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. जखमी प्रवाशांनी मदतीसाठी आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

अपघाताची माहिती मिळताच अजिंठा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पवन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संतोष पाईकराव, संदीप कोथळकर, विलास सोनवणे, महिला पोलीस सुरेखा काळे, संजय कोळी यांच्यासह स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी प्रवाशांना तातडीने अजिंठा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

दरम्यान, पोलिसांनी अपघातानंतर तत्परता दाखवत रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न केले. अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला केल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

अजिंठा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या जखमींवर वैद्यकीय अधीक्षक दिनाजी खंदारे, डॉ. अमोल गिरी, डॉ. महेश राठोड तसेच आरोग्य कर्मचारी सुरेखा गव्हाणे, उज्वल वाघमारे, चित्रा हिरे, रोहित राव व नितीन गजभे यांनी तातडीने उपचार सुरू केले. जखमी प्रवाशांमध्ये काहींना डोक्याला, नाकाला, हाताला व पायाला दुखापत झाली आहे. अपघातामुळे प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातानंतर एसटी बसच्या चालकाने बसचे ब्रेक निकामी झाल्यामुळे हा अपघात घडल्याचे सांगितले. मात्र, काही प्रवाशांनी बस निष्काळजीपणे चालविल्यामुळे अपघात झाल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे अपघाताचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे. विशेष म्हणजे या अपघातात बसचा चालक व वाहक दोघेही सुखरूप असल्याची माहिती आहे.

# सारडे जिल्हा परिषद शाळेला संगणकाची भेट; आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी दिशा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, नवनवीन अभ्यासक्रम तसेच शैक्षणिक विषय सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजून घेता यावेत, या उद्देशाने इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउन यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, सारडे येथे संगणक भेट देण्यात आला.

या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन इन्नर व्हील क्लबच्या अध्यक्षा हेतल खोना, सचिव भारती विक्रमसी, क्लब मेंबर आशिता दावडा व मिनल शहा यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली व नियोजनातून करण्यात आले. ग्रामीण विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.




कार्यक्रमाला इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउनच्या अध्यक्षा हेतल खोना, सचिव भारती विक्रमसी, क्लब मेंबर आशिता दावडा व मिनल शहा, आकाश फाउंडेशन मुंबईच्या सचिव संजीवनी श्रृंगारे, सारडे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका समृद्धी व्हाडी, शिक्षिका अपूर्वा घरत, रश्मी पवार, वनिता पाटील, सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, कृषी मित्र प्रकाश माळी, हॉटेल MDSचे मालक नितीन म्हात्रे, साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे जयेश म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनायक म्हात्रे, उपाध्यक्ष उज्वला पाटील, सदस्या पूनम पाटील, कविता म्हात्रे, मंगेश पाटील, मदतनीस ज्योत्स्ना पाटील तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना इन्नर व्हील क्लबच्या अध्यक्षा हेतल खोना म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात दर्जेदार शिक्षण घेता यावे आणि आधुनिक माहिती-तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे, यासाठी इन्नर व्हील क्लब सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून आवश्यक ती मदत करणे आणि निःस्वार्थ भावनेने सेवा देणे, हा क्लबचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या सामाजिक उपक्रमाबद्दल शिक्षिका अपूर्वा घरत यांनी इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाउनटाउन, आकाश फाउंडेशन मुंबई, सारडे विकास मंच तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि भविष्यात प्रगती करण्याची प्रेरणा मिळते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

संगणकाच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला डिजिटल बळ मिळणार असून, सारडे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# सुवर्णा ज्ञानेश्वर (आप्पा) वाघ 'महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित; अभिनंदनाचा वर्षाव

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२८ सप्टेंबर

जनतेच्या विश्वासाच्या बळावर सामान्य कार्यकर्त्याला आपण घोसला ग्राम पंचायत कार्यालयाचा सरपंच म्हणून सेवा करण्याची संधी दिली.

सरपंचपदाची धुरा हाती घेताच संपूर्ण जगावर कोरोना सारख्या भीषण महामारीचे संकट ओढवले. तो काळ कामाचा नव्हता, तर एका अत्यंत कठीण 'अग्निपरीक्षेचा' होता. या काळात काही मन हेलावून टाकणारे दुःखद प्रसंग अत्यंत जवळून पाहिले, तर काही विसरता न येणारे सेवेचे क्षणही अनुभवले. संकटांचे डोंगर समोर उभे असतानाही जनतेने दाखवलेला अढळ विश्वास यांमुळेच प्रत्येक संकटावर मात करत खंबीरपणे उभा राहू शकलो.

याच निस्वार्थ सेवेची दखल राज्यस्तरावर घेतली गेली आहे. घोसला गावचे माजी सरपंच, तथा पत्रकार यांना दि.२७ रविवार रोजी पुणे नवी पेठ येथील पत्रकार भवनात 'राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी त्यांच्या पत्नी सुवर्णा वाघ उपस्थित होत्या.




**हा सन्मान मला आगामी काळात घोसला गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनसेवेसाठी अधिक आत्मविश्वासाने व ताकदीने काम करण्याची नवी ऊर्जा देणारा आहे.गुरु गंगा बाबांचे आशीर्वाद व आपली साथ अशीच कायम राहो अशी मनोमन व्यक्त केले.**

**- सुवर्णा ज्ञानेश्वर पाटील,माजी सरपंच,ग्रामपंचायत घोसला ता. सोयगाव जिल्हा - छत्रपती संभाजीनगर**

हा पुरस्कार माझा एकट्याचा मुळीच नसून, हा सन्मान माझ्या घोसला येथील प्रत्येक मायबाप जनतेचा, ग्रामस्थांचा आणि सहकाऱ्यांचा आहे.तुमच्या खंबीर साथीशिवाय आणि प्रेमाशिवाय ही वाटचाल कधीच शक्य झाली नसती.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911